**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरीता जर्मन भाषेचे मोफत प्रशिक्षण

औद्योगिकदृष्ट्या संपन्न असलेल्या जर्मनीमध्ये उपलब्ध असणाऱ्या रोजगार संधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जातीच्या १००० उमेद्वारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व निटकॉन, दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित प्रशिक्षणाद्वारे जर्मन भाषेचे पथदर्शी अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. GOETHE Institute द्वारे बहाल केलेली प्रमाणपत्रे ही जर्मन देशात वैध मानली जातात. सदर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी GOETHE Institute यांच्याकडून घेण्यात येणारी परिक्षा उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यातील पात्र उमेद्वारांकडून जर्मन भाषेचे प्रशिक्षणाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

**प्रशिक्षणाचा कालावधी-** ३ महिने

**अर्ज करण्याचा अंतीम दिनांक- दि. २५.०३.२०२५**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता-** शासन निर्णयामध्ये निश्चित केलेल्या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची जर्मनीमध्ये कमतरता असल्याने, खालील तक्त्यामध्ये नमूद क्षेत्रातील किमान शैक्षणिक व कौशल्य प्राप्त उमेद्वारांकरीता जर्मनी भाषेचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शैक्षणिक पात्रतेता तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| विषय | शैक्षणिक पात्रता | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| • NURSING | DIPLOMA/ DEEGREE | • ACCOUNTING | B.com/ M.com |
| • LAB ASSIDTANT | DIPLOMA / DEEGREE | • HOTEL MANAGMENT | DIPLOMA/ DEEGREE |
| • DENTAL ASSITANT | DIPLOMA/ DEEGREE | • MARKETING/SALES | MBA/ DEEGREE |
| • PHYSIOTHERAPISTS | DIPLOMA/ DEEGREE | • ELECTRICIANS | ITI/DIPLOMA/ DEEGREE |
| • ADMINISTRATION | B.C.A./ B.B.A. DEEGREE | • ATOMOBILE | ITI/DIPLOMA/ DEEGREE |
| • HOUSEKEEPERS/ CLEANERS | DEEGREE | • PACKERS/ MOVERS | DEEGREE |

**लाभ:**

१) प्रति माह रू. ४०००/- विदयावेतन
२) प्रशिक्षण प्राप्त विदयार्थ्यांना GOETHE Institute मार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षा देण्यासाठी परिपूर्ण सहाय्य देण्यात येईल.
३) प्रशिक्षणार्थीना पासपोर्ट, व्हिसा व अन्य आवश्यक कागदपत्रे यांच्या पूर्ततेसाठी सहाय्यता देण्यात येणार आहे.

**पात्रता:**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला असावा.
३) रु. ८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.
४) वयोमर्यादा- वय वर्ष १८ ते ३५ असावे.
५) आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

**आवश्यक कागदपत्रे:**

कागदपत्र पडताळणीवेळेस पुढील कागदपत्राची मूळ प्रत व दोन झेरॉक्स प्रत (स्वसाक्षांकीत) सादर करणे आवश्यक आहे.

१) विहित नमून्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज
२) विहित नमून्यातील प्रतिज्ञा पत्र
३) शैक्षणिक व व्यावसायिक प्रमाणपत्र (१०वी, १२वी, ITI, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी)
४) शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला
५) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/ डोमेसाईल प्रमाणपत्र
६) अनुसुचित जातीचा दाखला, / जात पडताळणी प्रमाणपत्र
७) उत्पन्नाचा दाखला (रु. ८ लाखापर्यंत उत्पन्न असल्यासच पात्र)
८) आधार कार्ड, पॅनकार्ड
९) पासपोर्ट साईज फोटो
१०) प्रशिक्षणासाठी नोंदविलेल्या नावाचेच बँक पासबुकची झेरॉक्स

**चाळणी परीक्षेचे स्वरूप :**

| अ.क्र. | तपशिल | प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| १ | लेखी परीक्षा-<br>सामान्य इंग्रजी भाषेचे ज्ञान | २५ प्रश्न | ५० |
| २ | मुलाखत | - | ५० |
| | **एकुण** | - | **१००** |

**अर्ज भरण्यासाठी सूचना :**

- उमेदवारांनी आपल्या जवळच्या निटकॉन प्रशिक्षण केंद्रावर जाऊन अर्ज सादर करावेत व मूळ कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी किंवा सोबत जोडलेल्या QR कोड वर स्कॅन करून संपूर्ण माहिती भरावी व प्रशिक्षण केंद्र निवडून संबंधित केंद्रावर दिलेल्या मुदतीपर्यंत कागदपत्राची पडताळणी करून घ्यावी.
- कागदपत्रांच्या पडताळणी नंतर पात्र उमेदवारांना चाचणी परीक्षा व मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल. चाचणी परीक्षेचे स्वरूप सामान्य इंग्रजी भाषेचे ज्ञान या आधारावर एकूण गुण ५० गुणांची, २५ प्रश्नांची हे स्वरूप असेल व मुलाखतीसाठी ५० गुण असे मिळून १०० गुणांचे मुल्यांकण असेल.
- उमेदवारांनी ज्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी अर्ज केला आहे त्याची प्रवेश परीक्षा व मुलाखती त्याच केंद्रावर होईल याची नोंद घ्यावी.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- उपरोक्त जर्मन भाषा प्रशिक्षण हे अनिवासी असून सदर संपूर्ण खर्च बार्टी पुणे मार्फत करण्यात येईल.
- संबंधित उमेदवारांनी मूळ कागदपत्रासह स्व:खर्चाने निवड कार्याक्रमस्थळी उपस्थित राहावे याची नोंद घ्यावी.
- प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रशिक्षण केंद्रावर व बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- प्रति माह ७५ टक्के पेक्षा जास्त उपस्थिती असल्यासच विद्यावेतन अदा केले जाईल
- प्रशिक्षण केंद्रातील आवश्यक विदयार्थी क्षमता पूर्ण झाल्यावरच सदर प्रशिक्षण केंद्रावरील प्रशिक्षण सुरू करण्यात येईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- उपरोक्त जाहिरारातीतील नमूद केलेल्या प्रशिक्षणार्थी संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार मा. महासंचालक,बार्टी यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.

**प्रशिक्षण केंद्राचा पत्ता**

| अनु. क्र. | प्रशिक्षण केंद्राचा पत्ता | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, आयटी स्टडी सेंटर C/o कै. वामनराव पितांबरे कॉलेज, राधा कृष्णा सोसायटी, आर्च अंगण च्या समोर, नाशिक रोड, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड ४३१००२ | ९४२०४०१३५६ |
| २ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, म्हाडा कॉम्प्लेक्स, बाबा पेट्रोल पंपा जवळ, छत्रपती संभाजीनगर, पिन कोड ४३१००१ | ९१५६८४६२०६ |
| ३ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, रेनबो इन्स्टिट्युट आदर्श महाविद्यालय पाण्याच्या टाकीजवळ हिल टॉप कॉलनी हिंगोली ता.जिल्हा.हिंगोली पिनकोड ४३१५१३ | ९८२२७०९८५४ |
| ४ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, टर्बो इन्स्टिटूट पॉईंट प्लॉट न. ७, जुना सुभेदार लेआऊट विस्तार, एस. बी. आय. बँकेच्या मागे, मानेवाडा रोड, नागपूर ४४००२४ | ९४०५६५२३९६ |
| ५ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या शेजारी दापोडी पुणे -१२ | ९७६६७८११९७ |
| ६ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र,महाराष्ट्र विद्यार्थी सहाय्यक मंडळ अशोक विद्यालय ॲण्ड ज्यू कॉलेज (सायन्स ,आर्ट्स & कॉमर्स ) ४८४, सदाशिव पेठ,टिळक रोड,पुणे ४११०३० | ९१७२७५१९६३ |
| ७ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, मार्ग अकॅडेमी C/o हाईटेक कॉम्पुटर प्लॉट न. १८०, गजानन सोसायटी, गजानन मंदिर समोर, दत्तवाडी, अमरावती रोड, नागपूर ४४००२३ | ९४०५६५२३९६ |
| ८ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, दुकान क्रमांक ०६, स्वामी जोशी बेडेकर कॉलेज चेंदणी समोर, कोळीवाडा रोड, सिडको बस स्टॉप जवळ, ठाणे, महाराष्ट्र ४००६०१ | ९५४५३२६४६४ |
| ९ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, तिसरा मजला, शिवनेरी बँक्वेट हॉल, शिवराम सदन, (अप-पुरारकर हॉस्पिटल/व्हाइट प्लस शॉप), स्वामी हॉटेल जवळ, लाईन आळी, जुनी पनवेल नवी मुंबई ४१०२०६ | ९१४५१५१९६४ |
| १० | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, प्रोफेसर कॉलनी चौक, तहसील ऑफीस शेजारी, अहिल्यानगर | ९०२२७७०८६६ |
| ११ | निटकॉन प्रशिक्षण केंद्र, दि लेप्रसी मिशन,व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर हिरावाडी रोड सिग्नल जुना आडगाव नाका पंचवटी नाशिक ४२२००३ | ९६६५९७८९९९ |

- **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दिनांक १२/०३/२०२५ पासून २५/०३/२०२५ पर्यंत खालील QR कोड स्कॅन करून अर्ज सादर करावे आणि प्रशिक्षण केंद्रावर जाऊन परीपूर्णरित्या भरलेला अर्ज सादर करावा व कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी.**

**अधिक माहितीसाठी संपर्क क्र. ०२०-६७६७८२६२**

**Scan For Registration**

SCAN ME

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**